क्र- का॰प्रा॰वि/आयसीडी/2021-22/47

मसुदा
क्र.३/२०२१–२०२२

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२०२२ मधील २४ जून, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची दुसरी सभा **गुरूवार, दिनांक २४ जून, २०२१ रोजी दुपारी २:०० वाजता** आयेजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणापासून बचाव करण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४ | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | डॉ. कविता लघाटे | सदस्य |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ९. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| १०. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ११. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १२. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १३ | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १४. | डॉ. बळीराम गायकवाड (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १५. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १६. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➢ **स्वागत :-**

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➤ **अनुपस्थिती :-**

डॉ. बी.एन. जगताप व श्री. दिपककुमार मुकादम यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➤ **श्रध्दांजली :-**

**श्री. राजेश तासगावकर**

सरस्वती एज्युकेशन ट्रस्टचे विश्वस्त श्री. राजेश तासगावकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक २८ मे २०२१ रोजी निधन झाले.

**प्राचार्य. मीरा दातार**

चित्रकार आणि मॉडेल आर्ट इन्स्टिटयुटच्या निवृत्त प्राचार्य मीरा दातार यांचे प्रदिर्घ आजाराने दिनांक ३० मे, २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६१ वर्षांच्या होत्या.

**श्री. राधाकृष्ण नार्वेकर**

ज्येष्ठ पत्रकार 'सकाळ' मुंबईचे माजी संपादक श्री. राधाकृष्ण नार्वेकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०१ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते.

**श्री. अमोल पवार**

मुंबई विद्यापीठातील हंगामी सुरक्षा रक्षक श्री. अमोल पवार यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०३ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४० वर्षांचे होते.

**श्री. शंकर नम**

आदिवासी समाजाचे नेते माजी आमदार श्री. शंकर नम यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०५ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते.

**श्री. राम खांडेकर**

माजी पंतप्रधान पी. व्ही.नरसिंहराव यांचे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून दिर्घकाळ काम केलेले श्री. राम खांडेकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०८ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**श्री. डिंको सिंग**

माजी आशियाई सुवर्णपदक विजेता बॉक्सिंगपटू डिंको सिंग यांचे दिर्घ आजाराने दिनांक १० जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ४२ वर्षांचे होते.

**श्री. किरण जोगळेकर**

संगीत, क्रिकेट, समाजकारण आणि उदयोग क्षेत्रात नावलौकिक मिळवणारे श्री. किरण जोगळेकर यांचे हृदयविकाराने दिनांक ११ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षांचे होते.

**श्री. नारायण बांदेकर**

ज्येष्ठ मुद्रितशोधक आणि लेखक वाचक चळवळीचे कार्यकर्ते श्री. नारायण बांदेकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १४ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

**श्री. मिल्खा सिंग**

ॲथलेटिक्समध्ये देशाचा तिरंगा सातासमुद्रापार फडकवणारे भारताचे महान धावपटू श्री. मिल्खा सिंग यांचे अल्पशा आजाराने दिनांक १८ जुन २०२१ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक २७ मे, २०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दि. २७ मे, २०२१ रोजीच्या इतिवृत्तास खालील सुधारणांसह मान्यता देण्यात आली.<br>१. **चर्चेच्या अनुषंगाने पारीत झालेले ठराव : बाब क्र.८ पृष्ठ क्र. १२** मा. कुलगुरूंनी सभागृहास अवगत केले की, विद्यापीठाने शासनाकडे १ विधी सल्लागार, दोन संचालक पदे, (ठाणे व रत्नागिरी उपपरिसरासाठी) आणि १ रत्नागिरी उपपरिसरासाठी जनसंपर्क अधिकारी अशा पदांची मागणी केली होती. त्यापैकी शासनाने केवळ विधी सल्लागार हे पद मंजूर करून उर्वरीत तीन पदे विद्यापीठाने विद्यापीठ फंडामधून निर्माण करून भरावीत असे कळविले आहे.<br>यावर सर्वानुमते असे ठरले की, उपपरिसरांची दोन संचालक पदे, त्याचबरोबर नव्याने सुरू होणा-या सिंधुदुर्ग, रायगड, पालघर जिल्हयांतील उपपरिसराच्या संचालक पदासाठी आणि रत्नागिरी येथे एक जनसंपर्क अधिकारी या सर्व पदांसाठी शासनाकडे पुन:श्च निवेदन दयावे.<br>तसेच असाही ठराव करण्यात आला की, वरील नमुद जनसंपर्क अधिकारी पदाची मान्यता मिळेपर्यंत रत्नागिरी उपपरिसर व होऊ घातलेल्या सिंधुदुर्ग उपपरिसरासाठी विद्यापीठ फंडातून एक जनसंपर्क अधिकारी यांची तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात यावी. | |

**च्या ऐवजी असे वाचावे**

मा. कुलगुरूंनी सभागृहास अवगत केले की, विद्यापीठाने शासनाकडे १ विधी सल्लागार, दोन संचालक पदे, (ठाणे व रत्नागिरी उपपरिसरासाठी)आणि१ रत्नागिरी उपपरिसरासाठी जनसंपर्क अधिकारी अशा पदांची मागणी केली होती. त्यापैकी शासनाने केवळ विधी सल्लागार हे पद मंजूर करून उर्वरीत तीन पदे विद्यापीठाने विद्यापीठ फंडामधून निर्माण करून भरावीत असे कळविले आहे.

यावर सर्वानुमते असे ठरले की, उपपरिसरांची दोन संचालक पदे, त्याचबरोबर नव्याने सुरू होणाऱ्या सिंधुदुर्ग, रायगड, पालघर जिल्हयांतील उपपरिसराच्या संचालक पदासाठी आणि रत्नागिरी येथे एक जनसंपर्क अधिकारी या सर्व पदांसाठी शासनाकडे पुन:श्च निवेदन दयावे.

तसेच असाही ठराव करण्यात आला की, वरील नमूद जनसंपर्क अधिकारी पदाची मान्यता मिळेपर्यंत रत्नागिरी उपपरिसर व होऊ घातलेल्या सिंधुदुर्ग उपपरिसरासाठी विद्यापीठ फंडातून एक (१) जनसंपर्क अधिकारी यांची तात्पुरत्या स्वरुपात (सहा महिन्यांकरिता) नेमणूक करण्यात यावी व त्यास दर महिना रू. ४०,०००/- (चाळीस हजार) एकत्रित वेतन देण्यात यावे. सदर पद भरण्यासाठी, ९ एप्रिल, २०२१च्या व्यवस्थापन परिषद बैठकीच्या इतिवृत्तानुसार गठीत केलेल्या १)मा. कुलगुरू, २)प्र-कुलगुरू ३) प्राचार्य (डॉ.) अजय भामरे व ४) एक शिक्षक यांच्या समितीने योग्य त्या उमेदवाराची निवड करावी असे ठरले.

**२. चर्चेच्या अनुषंगाने आलेली बाब क्र. ९ पृष्ठ क्र. १२**

'श्री. प्रदीप सावंत यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, विद्यापीठाच्या कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांना विनाभाडे तत्वावर निवासस्थान देण्यात यावे. परंतु कुलगुरूंनी असे नियमानुसार करता येणार नाही, असे सांगून सदर बाब कामकाजातून वगळण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| | ३. **चर्चेच्या अनुषंगाने आलेली मात्र दि. २७ मे, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तात नमुद न केलेली बाब क्र. १०**<br><br>ॲड. नील हेळेकर यांनी कोरोना प्रादुर्भावाच्या काळामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या ज्या शुल्काचा विनियोग झालेला नसेल त्याबद्दल महाविद्यालयांना मार्गदर्शक तत्वे देऊन शुल्क कमी करावयास सांगावे असे मत मांडले. त्यावेळी मा. प्र-कुलगुरु यांनी सांगितले की, शासनाने याबाबत मार्गदर्शक धोरण देणेबाबतचे पत्र यापूर्वीच मुंबई विद्यापीठाने महाराष्ट्र शासनास पाठविले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनास सदरबाबत पुन:श्च एक पत्र पाठविण्यात यावे असा ठराव करण्यात आला. | |
| बाब क्र. २ | मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २४ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीमध्येबाब क्र. २ अन्वयेझालेल्या चर्चेनुसार मुंबई विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्याबाबत पुरस्काराचे मापदंडाची मार्गदर्शक तत्वे तयार करण्याकरीता गठीत केलेल्या समितीने केलेली मार्गदर्शक तत्वे/नियमावली अहवाल मान्यतेकरीता सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. २४ जुलै, २०२० रोजीच्या बैठकीतील बाब क्र. २ नुसार झालेल्या चर्चेन्वये विद्यापीठातील शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांना गुणवंत अधिकारी/कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्याबाबत पुरस्काराचे मापदंडाची मार्गदर्शक तत्वे तयार करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर 'एखादा अधिकारी/कर्मचारी त्यांच्या विभाग प्रमुखांमार्फत अर्ज न करता परस्पर समितीला स्वत:चा अर्ज सादर करु शकतो' ही बाब अहवालामध्ये समाविष्ट करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. | |
| बाब क्र. ३ | मळगाव (ता.सावंतवाडी) येथील लोकमान्य मल्टींपरपज को-ऑप-सोसायटीच्या इमारतींचा तळमजला मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या कामासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याबाबत. | पायाभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभाग |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ४ | मुंबई विद्यापीठाच्या नियोजित Center of Excellence in Maritime Studies (CEMAS) अभ्यासक्रमासाठी वेंगुर्ला, नगरपरिषद येथील भूखंड क्र.४९ मधील जागा विद्यापीठास भाडेकराराने (Lease) मिळणेबाबत, तसेच बांधकाम होईपर्यंतच्या काळात वेंगुर्ला नगरपरिषदेच्या पर्यटन सुविधा केंद्राची इमारत नाममात्र दराने मिळणेसाठी मा.जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांना प्रस्ताव सादर करणेबाबत. | पायभूत सुविधा नियोजन, अंमलबजावणी व देखभाल विभाग |
| ठराव | सदर मुद्यावर सखोल चर्चा झाली. सदस्यांनी खालीलप्रमाणे मते व्यक्त केली. ॲड. निल हेळेकर यांनी सदर भाडेदर अत्यंत जास्त असल्याचे नमूद केले व असेही सुचविले की, CEMAS साठी वेंगुर्ला येथील बघत असलेल्या जागेमध्येच हे उपकेंद्र सुरु करावे.<br><br>श्री. प्रदीप सावंत यांनी भाडयाने जागा घेण्यापेक्षा विकत घ्यावी असे मत मांडले.<br><br>श्री. रविकांत सांगुर्डे यांनी विद्यापीठाच्या जमाखर्चाचा विचार करुन निर्णय घ्यावा, असे सुचविले.<br><br>डॉ. भामरे यांनी समिती नेमून समितीने तेथील जागांचे बाजारभाव, मुल्य काय आहे ते तपासून त्याप्रमाणे दिलेल्या अहवालानुसार निर्णय घ्यावा असे सुचविले.<br><br>चर्चेअंती सर्वानुमते असे ठरले की, बाब क्र. ३ आणि ४ साठी एक समिती गठीत करुन त्यांनी या जागेचा अभ्यास करावा, गरज भासल्यास प्रत्यक्ष जावे व कमीत कमी खर्चात मिळतील अशा इतरही जागा बघाव्यात, CEMAS साठी वेंगुर्ल्याची सुचविलेली जागा पण पहावी आणि लवकरात लवकर अहवाल द्यावा.<br><br>समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना देण्यात आले. सदर ठराव याच बैठकीमध्ये मंजूर करण्यात आला. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ५ | वित्त व लेखा समितीचे दिनांक ११ जून, २०२१ रोजीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा समितीच्या दिनांक ११ जून, २०२१ रोजीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ६ | Recommendation for Honorary Degree of LLD to Padma Bhushan Ustad Zakir Hussain. | परिक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ठराव | पद्मभूषण उस्ताद झाकीर हुसेन यांना मानद पदवी एल.एल.डी. देण्याबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. ॲड. निल हेळेकर यांनी अशाप्रकारे विद्यापीठातर्फे मानद पदवी देण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे/नियमावली आहे का, ज्यांना सदर पदवी द्यावयाची आहे त्यांचे विद्यापीठाच्या प्रती शैक्षणिक अथवा आर्थिक योगदान असावे का, विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील समाजासाठी काही कार्य केले आहे का, तसेच विद्यार्थ्यांना सदर पदवीचा काही उपयोग होणार आहे का, इत्यादीबाबत विचारणा केली. श्री. प्रदीप सावंत यांनी श्रीमती लता मंगेशकर आणि श्री. सचिन रमेश तेंडुलकर यांनाही सदर पदवी प्रदान करण्याबाबत सुचविले.<br><br>चर्चेअंती सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, सदर प्रस्ताव मान्य करुन अधिसभेला सादर करावा व यापुढे सदर पदवी देण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे तयार करण्याबाबत डॉ. विनोद पाटील, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना सुचित करण्यात आले. | |
| बाब क्र. ७ | विद्यापीठातील प्रवेश प्रक्रियेपासून ते निकालाच्या कार्यवाहीपर्यंत संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने परीक्षा विभागात End To End | परिक्षा व मुल्यमापन मंडळ |

| | | |
|---|---|---|
| ठराव | विद्यापीठातील प्रवेश प्रक्रियेपासून ते निकालाच्या कार्यवाहीपर्यंत संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने परीक्षा विभागात End To End प्रणाली विकसित करण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ८ | एम. ए. परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस "श्रीमती सुधा दवे" यांच्या नावे सुवर्ण पदक व पारितोषिक देण्याकरिता देणगीदार डॉ. एस्. ए. दवे यांच्या कडून सुवर्णपदकासाठी देणगी म्हणून रु. १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) आणि पारितोषिकासाठी रु. ६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) २० वर्षांकरिता स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत. | परीक्षा व मुल्यमापन मंडळ |
| ठराव | एम. ए. परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस "श्रीमती सुधा दवे" यांच्या नावे सुवर्ण पदक व पारितोषिक देण्याकरिता देणगीदार डॉ. एस्. ए. दवे यांच्या कडून सुवर्णपदकासाठी देणगी म्हणून रु. १०,००,०००/- (रुपये दहा लाख फक्त) आणि पारितोषिकासाठी रु. ६,००,०००/- (रुपये सहा लाख फक्त) २० वर्षांकरिता स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| **आयत्यावेळी आलेल्या बाबी** | | |
| बाब क्र. ९ | चर्चेच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, विद्यापीठाचे अधिकारी निवृत्त झाले तरीही त्यांचे विविध ठिकाणांचे सभासदत्व अद्याप सुरुच आहे. उदा. MCA Club येथील सभासदत्व. सदर व्यक्तींची सभासदत्वे तात्काळ रद्द करावीत असे सर्व सभासदांनी सांगितले. मा. कुलगुरुंनी मा. कुलसचिवांना सदरबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | क्रिडा व शारीरिक शिक्षण |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. १० | चर्चेच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, ~~कलिना परिसरामध्ये~~ अनेक व्यक्तींना विविध भत्ते दिले जातात ते नियमानुसार आहेत की नाहीत हे तपासणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्वानुमते असे ठरविण्यात आले की, सदर भत्ते देणेबाबत तात्काळ समिती गठीत करुन समितीच्या अहवालानुसार सदर व्यक्तींना भत्ते देणेबाबत पुढील निर्णय घ्यावा. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव

प्रभारी कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू